# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/09/2023 (शनिवार) दुपार

---

## चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील डोरली शिवार येथे दिनांक ३१/०८/२०२३ ते दिनांक ०१/०९/२०२३ चे २३/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे —ऋशिकेश दिनकरराव देशमुख, वय ३५ वर्ष, रा. धामणा अमरावती रोड नागपुर हे एसेन्ट टावर प्रायव्हेट लिमिटेड येथे टेक्नीशियन म्हणून नौकरी करतात. फिर्यादीचे कंपनीचे डोरली शिवारात टावर आहे. कंपनीचे टावरमध्ये कोठेही बिघाड झाला की काय त्याबाबत माहीती कंपनीचे ऑफीसला येते व कंपनी फिर्यादीला कॉल करून सांगतात की, कोणत्या टावरमध्ये बिघाड झाला किंवा टावर बंद झाले. याबाबत त्या ठिकाणी जावून पाहणी करावी लागते. दिनांक ३१/०८/२०२३ ते ०१/०९/२०२३ रात्री ११/०० वा. दरम्यान कंपनी मधून कॉल आला की, डोरली शिवारातील टावरमध्ये बिघाड झाला आहे. आपण तेथे जावून पाहणी करावी. यावरून फिर्यादी रात्री ०२/०० वाजताचे सूमारास डोरली टावर जवळ जावून पाहणी केली असता टावरचे ओ. सी. डी. बॉक्समधील बी. बी. यू. जिओ—५ जी चे ईक्वीपमेंट चोरी गेल्याचे दिसले. ज्याची किंमत अंदाजे ६०,०००/—रू. ते ७०,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा करपाते ब. नं. २१३ मो. नं. ९९६०६८२४७८ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील टेमसना ता. कामठी जि. नागपुर येथे दिनांक ३१/०८/२०२३ चे २१.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुरेश घनशाम सुर्यवंशि रा. टेमसना ता. कामठी जि. नागपुर हे टेमसना येथील सलुनची दुकान बंद करून जात असता ग्रामपंचायत येथे लोकांची गर्दी दिसली असता जावुन पाहीले असता आरोपी नामे— मोहीत शिवशंकर फुलझेले, रा. टैमसाना ता. कामठी जि. नागपुर हा हातात चाकु घेउन गावातील लोकांवरून चाकु घेउन फिरवतांनी दिसला व जवळच गुरूदेव सुर्यवंशी व सौरभ इंगोले हे जखमी अवस्थेत दिसले दोघांनाही जखम होवुन रक्त निघत होते. आरोपी हा कुणालाही जवळ येवु देत नव्हता कोणी त्याला समजवण्याचा प्रयत्न केला असता चवताळुन अंगावर यायचा. फिर्यादी सुद्धा त्याला पकडण्यास गेले असता चवताळुन आला व फिर्यादीच्या डाव्या हातांच्या दंडावर चाकुने वार केला व जो कोणी माझ्या मधात येईल त्याला मारून टाकीन अशी धमकी देत होता. तो पुन्हा वार करण्याचा प्रयत्न करत होता त्याच्या हातातला चाकु पकडला असता चाकु सोडुन पळुन गेला. गावातील लोकांनी मेयो येथे दाखल केले फिर्यादीला गुरूदेव व सौरभ यांनी सांगीतले की ग्रामपंचायत जवळ आरोपी हा तीथे आला रंगदारी करून शिविगाळी करू लागला. फिर्यादीने त्याला हटकले असता त्यांच्यावर चाकुने वार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार यंगलवार मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**